CNRNO.-MHLA15000976-2022

**जुना फौ.कि.अर्ज क्र. ९७/२०२२ मधील नि.क्र. १ दि.१९.०८.२०२२ रोजीच्या अर्जावरील आदेश.**

१. सदर अर्ज अर्जदार दिगांबर ज्ञानोबा गुणाले यांनी पोलीस स्टेशन चाकूर येथील गुन्हा रजि.क्र.१०९/२०२२ भा.दं.वि. कलम ३९७,३२४,५०४ मधील जप्त मुद्देमाल ओप्पो सीपीएच २२६९ मोबाईल ज्याचा आयएमइआय नं ८६११४४०५२९८४११३ व ८६११४४०५२९८४१०५ हे परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. तपासिक अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दि.१५.०९.२०२२ रोजी दाखल करुन अर्जदाराने मागणी केलेले मुददेमाल अर्जदारास अटी व शर्तीवर परत करण्या संदर्भात हरकत नसल्याचे सांगितले. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे सादर करुन गुन्हयाची गंभीरता आणि तपासिक अधिकारी यांचे म्हणणे लक्षात घेता योग्य तो आदेश पारीत करण्याबाबत विनंती केली.

३. अर्जदाराचे वकीलांचा व सहा. सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने यश एजन्सीचे कर्ज मंजूरी पत्राची छायांकित प्रत तसेच अर्जदाराच्या आधार कार्डची प्रमाणीत प्रत दाखल केल्या आहेत.

४. उपलब्ध कागदपत्रांवरुन अर्जदार हा चाकूर पोलीसांनी जप्त केलेले वर नमुद मोबाईल याचा कायदेशीर ताबेदार असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीने अर्जदाराला जप्त मुद्देमाल देण्यासंदर्भात आक्षेप नोंदवलेला नाही तसेच सदर मुद्देमालाची मागणी केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हे आज रोजी सदर मुद्देमालाचा कायदेशिर ताबेदार असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होते.

५. प्रथम खबरी अहवालावरुन व कागदपत्रवरुन आजच्या घडीला असे दिसून येते की, जप्त केलेला मुद्देमाल हा संसारोपयोगी घटक आहे. प्रकरणाचे स्वरुप पहाता जप्त मुद्देमालाचा ताबा देतांना कांही अटी व निर्बंध लादणे हे आवश्यक आहे.

त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो.

**– <u>आदेश</u> –**

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज अंतरीम स्वरुपात खालील अटीवर मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार नामे **दिगांबर ज्ञानोबा गुणाले** यांना पोलीस स्टेशन चाकूर येथील गुन्हा रजि.क्र.१०९/२०२२ भा.दं.वि. कलम ३९७,३२४,५०४ मधील जप्त मुद्देमाल ओप्पो सीपीएच २२६९ मोबाईल ज्याचा आयएमइआय नं ८६११४४०५२९८४११३ व ८६११४४०५२९८४१०५ एकूण मुल्य रु.१३,४९०/– (रुपये तेरा हजार चारशे नव्वद फक्त) इतक्या बंधपत्रावर जप्त मुद्देमालाचा ताबा अंतरीम स्वरुपात अर्जदाराला देण्यात येतो. |
| ३. | अर्जदाराने वरील मुद्देमालामध्ये प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारे फेरबदल या न्यायालयाच्या परवानगीशिवाय करु नये. |
| ४. | अर्जदाराने वरील मुद्देमाल प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत कोणत्याही ति–हाईत इसमास विक्री, गहाण ई. बाबतचा करार या न्यायालयाच्या परवानगीशिवाय करु नये व त्याचे जतन करावे. |
| ५. | अर्जदाराने भविष्यात न्यायालयाच्या आदेशान्वये जप्त मुद्देमाल गरज पडल्यास हजर करावे. |
| ६. | तपासीक अंमलदार यांनी वरील मुद्देमालाचा सविस्तर पंचनामा करावा व त्याचे छायाचित्र हे न्यायालयात पाठवावे.  तसेच अर्जदाराने बंधपत्र हे न्यायालयात दाखल करावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRASHANT PRAKASHRAO KALE
Date: 2022.10.04 16:50:12 +0530

( पा.पा. काळे)

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

दिनांक : ०४.१०.२०२२ चाकूर.